Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

तातडीचे/महत्वाचे
परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-७/२३७१
पुणे - ४११ ००४
दिनांक - ५/०६/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
सर्व विभागीय मंडळे.

**विषयः जून-जुलै २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, **जून-जुलै २०२६ साठी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचे प्रवेशपत्रे** (Hall Ticket) ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, आपल्या विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना **जून-जुलै २०२६ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी)** (Hall Ticket) ऑनलाईन(Online) पध्दतीने मंडळाच्या www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर **दिनांक ०८/०६/२०२६** पासून Admit Card या link व्दारे download करण्याकरिता उपलब्ध होतील.

१ **जून-जुलै २०२६ साठी सर्व विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक** शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी इ.१० वी व इ.१२ वी परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यावयाची आहेत.

२ प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रिंटींग करताना विद्यार्थ्यांकडून त्यासाठी कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. सदर प्रवेशपत्राची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का उमटवून स्वाक्षरी करावी.

३ ज्या आवेदनपत्रांना "Paid" असे Status प्राप्त झालेले आहे त्यांचीच प्रवेशपत्रे "Paid Status Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

४ अतिविलंबाने आवेदनपत्रे भरलेल्या व Extra Seat No विभागीय मंडळामार्फत दिलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे "Extra Seat No Admit Card" या पर्यायाव्दारे उपलब्ध होतील.

कृ.मा.प.....

५ Download केलेल्या प्रवेशपत्रामध्ये नाव/आईचे नाव/ जन्मतारीख व इतर दुरूस्त्या असल्यास अथवा विषय/माध्यम बदल असल्यास प्रचलित पध्दतीनुसार विभागीय मंडळात प्रत्यक्ष संपर्क साधून योग्य त्या दुरूस्त्या करण्यात याव्यात.

६ ज्या आवेदनपत्रांना "Paid " असे Status प्राप्त झालेले नाही अशा आवेदनपत्रांचे शुल्क प्राप्त झाल्यानंतर त्यांचे Status Update होवून "Late Paid Status Admit Card" या Option व्दारे त्यांची प्रवेशपत्रे उपलब्ध होतील.

७ प्रवेशपत्रावरील फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करावयाची आहे.

८ प्रवेशपत्र विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन:श्च प्रिंट काढून त्यावर लाल शाईने व्दितीय प्रत (Duplicate) असा शेरा देऊन विद्यार्थ्यांस प्रवेशपत्र द्यावयाचे आहे.

माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांना प्रवेशपत्र download करण्यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास विभागीय मंडळाकडे संपर्क साधणेकरीता सूचित करावे व विभागीय मंडळांनी व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ यांचेशी पुढील कार्यवाहीसाठी संपर्क साधावा.

उपरोक्तनुसार आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य तसेच विद्यार्थी यांना सदर बाब अवगत करून देण्याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

Mali

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-४.

प्रत माहितीसाठी-

व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्य मंडळ, पुणे-०४.

क्र.नाविमं/माध्य.ब १/ 1253
नाशिक ४२२००३
दि. ०८/०६/२०२६

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,
नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार

उपरोक्त राज्य मंडळाच्या पत्रानुसार कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) जून/जुलै २०२६ परीक्षेच्या ऑनलाईन प्रवेशपत्राबाबतच्या पत्राचे अवलोकन होवून त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

(सरोज जगताप)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२००३

प्रत माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव

१. मा.शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक)— नाशिक/धुळे/जळगाव/नंदुरबार